Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No. 832 A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune- 411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.नं.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary.state board@gmail.com

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 I EPABX -25705000 I Secretary(P) : 25651750

महत्वाचे/तातडीने

क्र.रा.मं./परीक्षा-३/६७७४
दिनांक - ०१/१२/२०२१

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय- सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत....**

**संदर्भ:- क्र.रा.मं./परीक्षा-३/६५२४ दिनांक ११/११/२०२१ चे पत्र.**

उपरोक्त संदर्भीय विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेच्या शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची फक्त नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन ऑनलाईन पध्दतीने दि. १२/११/२०२१ ते ०२/१२/२०२१ तसेच व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे नियमित विद्यार्थी (Hsc Vocational Stream) व सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे नियमित शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने दि. ०३/१२/२०२१ ते ११/१२/२०२१ या कालावधीत व विलंब शुल्कासह दि. १३/१२/२०२१ ते २०/१२/२०२१ या कालावधीत भरावयाची होती. परंतु आवेदनपत्रे भरताना उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांना तांत्रिक व इतर अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब सदर आवेदनपत्रे भरण्यास मुदतवाढ देण्यात येत असून सदर मुदतवाढीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| शुल्क प्रकार | **उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन आणि व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे नियमित विद्यार्थी (Hsc Vocational Stream) व सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची , ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या मुदतवाढीच्या तारखा** | **उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन Download करुन बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा** |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| अ) नियमित शुल्कासह → | शुक्रवार दि.१२/११/२०२१ ते रविवार दि.१२/१२/२०२१ | शुक्रवार दि.१२/११/२०२१ ते शनिवार दि.२५/१२/२०२१ |
| ब) विलंब शुल्कासह → | सोमवार दि.१३/१२/२०२१ ते सोमवार दि.२०/१२/२०२१ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | |

अ) आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमीट केल्यानंतर त्यांना कॉलेज Login मधून Pre-list उपलब्ध करुन दिलेली आहे. कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रात नमूद केलेली माहिती जनरल रजिस्टरच्या माहितीनुसार पडताळून अचूक असल्याची खात्री करावी व त्याबाबत Pre-list वर विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर Pre-list चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी.

केंद्रावर ब) उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-list जमा करावयाची तारीख सोमवार दि.२७/१२/२०२१ राहील.

इ.१२वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शासनाने व विशेषतः आरोग्य विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.
२. शासन निर्णय क्र.गव्ह.१५१७/प्र.क्र.१९/संगणक दि.१४/०८/२०१७ नुसार उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी नियमित विद्यार्थ्यांची विज्ञान, कला व वाणिज्य शाखांची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी Saral Database मध्ये विद्यार्थ्यांची अद्ययावत नोंद असणे आवश्यक आहे. सदर Saral Data वरुनच नियामित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाची आहेत.
३. व्यवसाय अभ्यासक्रम (HSC Vocational) शाखेच्या नियमित विद्यार्थ्यांची, पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Repeater), श्रेणी सुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती Saral Data मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने ऑनलाईनच भरावयाची आहेत. त्याच्या तारखा वरीलप्रमाणे (कॉलम नं. ... नुसार) निश्चित करण्यात आल्या आहेत.
४. पुणे, औरंगाबाद, व कोल्हापूर विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित परीक्षा शुल्क बँक ऑफ इंडियाच्या चलनावरील नमूद मंडळाच्या Virtual Account मध्ये जमा करुन चलनाची प्रत व Pre-list दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर करावयात.
५. मुंबई, नागपूर व लातूर विभागीय मंडळाच्या कक्षेतील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलीत परीक्षा शुल्क एच.डी.एफ.सी.(HDFC Bank) बँकेच्या चलनावरील नमूद मंडळाच्या Virtual Account मध्ये जमा करुन चलनाची प्रत व Pre-list दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर करावयात.
६. अमरावती, नाशिक व कोकण विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित परीक्षा शुल्क ॲक्सिस (AXIS Bank) बँकेच्या चलनावरील नमूद मंडळाच्या Virtual Account मध्ये जमा करुन चलनाची प्रत व Pre-list दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर करावयात.

**जिल्हा वितरण केंद्रासाठी सूचना :- वरीलप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयांकडून जमा होणारी कागदपत्रे (उदा.चलन, विद्यार्थी यादी, प्री-लिस्ट इ.) विभागीय मंडळाकडे बुधवार दि.२९/१२/२०२१ रोजी जमा करावयाची आहेत. प्री-लिस्ट मध्ये ज्या विद्यार्थ्यांसाठी दुरुस्त्या करावयाच्या आहेत, अशा विद्यार्थ्यांची नोंद असलेली प्री-लिस्टचीच पाने प्राचार्यांनी प्रमाणित करुन जमा करुन घ्यावीत.**

७. आवेदनपत्रे सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शुल्क चलनाद्वारेच भरण्यात यावे. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी गतवर्षीप्रमाणेच परीक्षा शुल्क संगणकीय चलन Download करुन चलनावरील नमूदप्रमाणे मंडळाच्या Virtual Account मध्ये NEFT/RTGS व्दारे वर्ग करावयाचे आहे. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी NEFT/RTGS व्दारे वर्ग केलेली रक्कम त्यांच्या बॅक खात्यातून प्रत्यक्ष वजा झाली आहे किंवा नाही तसेच Account Number व IFSC Code चुकीचा नमूद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

८. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहित शुल्क भरल्याशिवाय संबंधितांचे प्रवेशपत्रे उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत. सदर बाब सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून दयावी. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी उपरोक्तप्रमाणे परिपूर्ण व अचूक शुल्क भरल्याची खातरजमा विभागीय मंडळ स्तरावर करुन त्याबाबतचा अहवाल गणकयंत्र विभागाच्या नमून्यात राज्यमंडळ कार्यालयास सादर केल्यानंतर संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात येतील.

९. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाव्दारेच भरण्यात यावे.

१०. सन २०२२ मधील परीक्षेसाठी, नोव्हेंबर–डिसेंबर २०२०, सन २०२१ च्या नियमित विद्यार्थ्यांना अथवा सप्टेंबर–ऑक्टोबर २०२१ मधील परीक्षेमध्ये एकाच वेळी सर्व विषय घेवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच श्रेणीसुधार योजनेंतर्गत आवेदनपत्र भरुन परीक्षेस प्रविष्ठ होता येणार आहे. त्यामुळे त्यापूर्वीचे असे उत्तीर्ण विद्यार्थी अथवा कोणताही पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी श्रेणीसुधार योनजेतंर्गत परीक्षेस प्रविष्ठ होणार नाही याबाबतच्या स्पष्ट सूचना विभागीय मंडळ स्तरावरुन सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात याव्यात.

११. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी उपरोक्त कालावधीमध्ये संबंधित प्रशिक्षण संस्थेव्दारे ऑनलाईन आवेदनपत्र भरणे आवश्यक आहे.

१२. उपरोक्त आवेदनपत्रे भरण्याच्या मुदत वाढीनंतर पुन:श्च मुदतवाढ देण्यात येणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

( डॉ.अशोक भोसले )
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–.४.

क्र.कोविमं/१२ वी परीक्षा/ 1873
कोल्हापूर-४१६००४.
दिनांक :- ०१/१२/२०२१

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा - सातारा/ सांगली / कोल्हापूर.

**विषय :- सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत...**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे भरुन घेणे तथा कागदपत्रे जमा करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी.

**देविदास कुलाळ**
**विभागीय सचिव,**
**म.रा.मा. व उ.मा. शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**

प्रत माहितीस्तव - १) मा. शिक्षण उपसंचालक कोल्हापूर विभाग कोल्हापूर.
२) शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. सातारा/सांगली/कोल्हापूर.